## मुंबई उच्च न्यायालयाकडून अदार पूनावाला यांना दिलासा

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

'कोविशील्ड' लस उत्पादक 'सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' आणि 'सीईओ' अदार पूनावाला यांच्याविरुद्ध १०० कोटी रुपयांच्या बदनामीकारक मजकूर सोशल मीडियावरून काढून टाकण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी दोन व्यक्तींना दिले आहेत. न्यायमूर्ती रियाझ छागला यांनी यावेळी झालेल्या सुनावणीत सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स योहान टेंग्रा आणि अंबर कोरी यांनी दाखल केलेला अंतरिम अर्ज निकाली काढला.

फिर्यादींनी आरोप केला आहे की, योहान टेंग्रा आणि अंबर कोरी यांनी 'कोविशील्ड' लसीच्या दुष्परिणामांबद्दल पूनावाला यांच्या विरोधात बदनामीकारक पोस्ट, लेख आणि व्हिडिओ पोस्ट केले होते. ''४० लाख लोकांचे जीव वाचवण्याची जबाबदारी असलेल्या लोकांना आता सामूहिक खुनी म्हणून ओळखले जात आहे. ही तुमची वैयक्तिक मते असू शकतात. परंतु, तुम्ही ती अशा प्रकारे सोशल मीडियावर टाकू शकत नाही,'' असा युक्तिवाद ज्येष्ठ वकील अस्पी चिनॉय यांनी केला होता. बदनामीकारक मजकुरामध्ये फिर्यादींना 'खूनी' आणि 'गुन्हेगार' म्हणून संबोधण्यात आले होते.

# 'राष्ट्र पहिले' हीच भाजपची नीती

■ भाजप नेते सी. टी. रवी यांचे प्रतिपादन



“ नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली लोकसभा निवडणुकीवेळी देशासमोर गुजरातच्या विकासाचे मॉडेल ठेवले. त्यावर जनतेने विश्वास ठेवून मतदान केले. पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक क्षण देशासाठी समर्पित केला आहे. त्यामुळे दुसऱ्यांदा पुन्हा नरेंद्र मोदी यांना मतदान करून पंतप्रधान केले. जनता हीच त्यांचा परिवार आहे.

**– सी. टी. रवी,** राष्ट्रीय सरचिटणीस तथा महाराष्ट्र प्रभारी, भाजप

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

''राष्ट्र पहिले' हीच भाजपची नीती आहे,'' असे ठाम प्रतिपादन भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस व महाराष्ट्र प्रभारी सी. टी. रवी यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला यशस्वी नऊ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त राज्यात 'मोदी@९' हे महासंपर्क अभियान राबविले जात आहे. या अभियानांतर्गत उत्तर मुंबई जिल्ह्याच्यावतीने कांदिवली येथे भाजप ज्येष्ठ कार्यकर्ता संवाद आणि प्रबुद्ध वर्ग संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी सी. टी. रवी उपस्थितांना संबोधित होते. यावेळी केंद्रीय संसदीय बोर्डाच्या सदस्या डॉ. सुधा यादव, खासदार गोपाळ शेट्टी, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक आणि भाजप गटनेते आमदार प्रवीण दरेकर, आमदार सुनील राणे, आमदार योगेश सागर, अभियानाचे सहसंयोजक कृपाशंकर सिंह, भाजप वरिष्ठ पदाधिकारी जयप्रकाश मिश्रा, महाराष्ट्र भाजप सचिव ॲड. अखिलेश चौबे, मुंबई भाजप उपाध्यक्ष प्रकाश दरेकर, मुंबई भाजप महामंत्री संजय उपाध्याय, मुंबई भाजप सचिव विनोद शेलार, मुंबई भाजप प्रवक्ता राणी दिवेदी, उत्तर मुंबई जिल्हा अध्यक्ष गणेश खणकर, उत्तर मुंबई जिल्हा महामंत्री बाबा सिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

सी. टी. रवी म्हणाले की, ''समाजात प्रबुद्ध वर्गही आहे आणि दुर्बुद्ध असणारे लोकही आहेत. फक्त नियतीची गरज आहे. भाजपकडे नीतीही आहे, नेताही आहे आणि नियतही आहे. भाजपची नीती आणि इतर राजकीय पक्षांच्या नीतीमध्ये फरक आहे. 'राष्ट्र पहिले', ही आपली नीती आहे.''

या अभियानाचे मुख्य संयोजक आमदार प्रवीण दरेकर म्हणाले की, ''हे अभियान एवढ्यासाठी आहे की, आपल्या देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखा नेता लाभला व नऊ वर्षांत आपल्या देशाचे नाव जगाच्या पाठीवर रोषण करण्याचे काम मोदी यांनी केले आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यामुळे नऊ वर्षांची कारकिर्द जनतेसमोर नीट जावी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासाठी केलेली विकासकामे, केलेले प्रकल्प, योजना, विविध समाज घटकांसाठी केलेली कामं ही तळागाळापर्यंत पोहोचावी म्हणून हे अभियान देशभर सुरू आहे.''

### ...म्हणून सर्वत्र महाजनसंपर्क अभियान : दरेकर

''आज सर्व देश पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारताकडे वेगळ्या नजरेने पाहत आहेत. यात पंतप्रधान मोदींचे अपारकष्ट आहेत म्हणून आज जो वर्ग नेहमी भाजपच्या मागे उभा राहिलाय किंबहुना मोदी पंतप्रधान झाल्यानंतर, नेतृत्व केल्यानंतर समाजातील जो बुद्धिजीवी वर्ग आहे, तो मोदींच्या नेतृत्वावर प्रभावित आहे. त्यामुळे जनतेचे काय म्हणणे आहे, हे जाणून घेण्यासाठी अशा प्रकारचा कार्यक्रम देशभर पक्षाच्यावतीने सुरू आहे,'' असे प्रवीण दरेकर यावेळी म्हणाले.

## भुयारी मेट्रोचा पहिला टप्पा डिसेंबरमध्ये मुंबईकरांच्या सेवेत!

### दुसरा टप्पा जुलै २०२४ पर्यंत सुरु होण्याचा अंदाज

■ **शेफाली ढवण**

**मुंबई, दि. ५ :**

स्वप्नांची नगरी म्हणून ओळख असणारी मुंबई कालानुरूप आपले रुपडे बदल असून यालाच जोड मिळाली आहे. मुंबईतील मेट्रोची. मेट्रो '२ ए' आणि '७' यानंतर आता लवकरच आणखी एक मेट्रो लाईन मुंबईकरांसाठी खुली होणार आहे. मागील अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असणारी मेट्रो लाईन '३' येत्या डिसेंबरमध्ये मुंबईकरांच्या सेवेत रुजू होणार आहे. विशेष म्हणजे ही मेट्रो लाईन भूमिगत मार्गे धावणार असल्यामुळे याची प्रतीक्षा मागील अनेक वर्षांपासून मुंबईकर पाहत आहे. सात बेटांचा समूह आणि चारही बाजूने समुद्राने व्यापलेल्या मुंबईत भूमिगत मार्गे मेट्रो धावणार म्हणून अनेकांना याचे कुतूहल आहे, तर अनेकांनी यावर टीकास्त्रदेखील सोडले. मात्र, या मेट्रोचे पहिल्या टप्प्यातील ८२ टक्के काम आता पूर्ण झाले असून येत्या डिसेंबर २०२३ मध्ये ही मेट्रो धावणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून देण्यात आली आहे. ही मेट्रो लाईन कुलाबा-वांद्रे-सीप्झ लाईन म्हणूनही ओळखली जात असून सुमारे ३३.५ किमी लांबीची ही मेट्रो लाईन आरे कॉलनी ते कफ परेड धावणार आहे. दरम्यान, डिसेंबर २०२३ मध्ये या लाईनचा पहिला टप्पा अर्थात आरे कॉलनी ते बीकेसी सुरू होणार असून जुलै २०२४ पर्यंत दुसरा टप्पा अर्थात बीकेसी ते कफ परेड सुरू होणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून देण्यात आली आहे.



**मुंबई मेट्रो लाईन '३'**

- टप्पा १ – आरे कॉलनी ते बीकेसी
- टप्पा २ – बीकेसी ते कफ परेड (अद्याप घोषणा नाही.)
- एकूण स्थानके – २७
- पहिला टप्पा एकूण स्थानके – १०
- दुसरा टप्पा एकूण स्थानके – १७

### केंद्र आणि राज्य सरकारचा संयुक्त उपक्रम

'मुंबई मेट्रो लाईन ३' अर्थात भूमिगत धावणाऱ्या या मेट्रो लाईनचा उपक्रम भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने घोषित करण्यात आला होता. यानुसार २०१८ मध्ये २३ हजार,१३६ कोटी रुपयांच्या मेट्रो मार्गाच्या बांधकाम आराखड्याला मंजुरी देण्यात आली होती. जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी (जेआयसीए) ही या प्रकल्पाच्या ५७.२ टक्के भागासाठी ओडीए कर्जाद्वारे ३० वर्षांच्या परतफेडीसह १३ हजार, २३५ कोटी वित्तपुरवठा करत आहे. यासाठी १.१५ टक्के व्याजदर आणि सल्लागार सेवेसाठी ०.०१ टक्का व्याजदर नियोजित करण्यात आले आहे.

### पहिल्या भूमिगत मेट्रोची सूत्रे 'डीएमआरसी'कडे

दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (डीएमआरसी) ही मुंबईतील पहिली भूमिगत मेट्रो मार्ग चालवणार असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने सांगितले आहे. जागतिक स्पर्धात्मक बोली प्रक्रियेनंतर 'डीएमआरसी'सोबत मुंबई 'मेट्रो लाईन ३' साठी सुमारे दहा वर्षांचा करार करण्यात आला आहे. यामध्ये दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापन,मेट्रो चालवणे आणि त्यांचे देखभाल करणे, सिस्टम इन्फ्रास्ट्रक्चर आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेची जाबदारीचा समावेश असणार आहे.

## डॉ. सुधाकर शिंदे अतिरिक्त आयुक्तपदी रूजू

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त म्हणून डॉ. सुधाकर शिंदे यांनी सोमवार, दि. ५ जून रोजी सकाळी पदभार स्वीकारला. पालिका प्रशासनाच्यावतीने सह आयुक्त (सामान्य प्रशासन) मिलिन सावंत यांनी डॉ. सुधाकर शिंदे यांचे स्वागत केले. डॉ. शिंदे यांनी पुणे येथील बी. जे. मेडिकल वैद्यकीय महाविद्यालयातून 'एमबीबीएस' पदवी संपादित केली. तसेच, औषधनिर्माणशास्त्रामध्ये त्यांनी संशोधनदेखील केले. त्यानंतर भारतीय राजस्व सेवेत (आयआरएस) त्यांनी २००७ मध्ये प्रवेश केला.



## १० जूनला युवा महोत्सवाचे आयोजन

**मुंबई :** दादर-माटुंगा सांस्कृतिक केंद्रातर्फे प्रीती ठाकोरभाई देसाई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शनिवार, दि. १० जून रोजी सायंकाळी ५ वाजता 'युवा महोत्सवाअंतर्गत क्षितिजा सहस्रबुद्धे (शास्त्रीय संगीत) आणि एस. आकाश (बासरीवादन) यांचा कार्यक्रम केंद्राच्या गोखले सभागृहात सादर करण्यात येणार आहे.


जाहीर सूचना

**खार रोड स्थानकाच्या फलाट क्र. १ – २ येथे उत्तर एफओबीचा दक्षिण जीना बंद करणार**

खार रोड स्थानकाच्या डेकच्या कॉलम पी-९च्या फाउंडेशनच्या अलायनमेंट येत असल्यामुळे, **खार रोड स्थानकाच्या फलाट क्र. १- २ येथे उत्तर एफओबीचा दक्षिण जीना** दिलेल्या वेळेमध्ये खार डेकचे काम पूर्ण करण्यासाठी पाडणे आवश्यक असल्यामुळे दक्षिण **जीना दिनांक ०८.०६.२०२३ पासून बंद करण्यात येणार आहे. प्रवाश्यांना सर्व फलाटांसाठी मिडल एफओबीचा तसेच पश्चिम बाजूकडे जाण्यासाठी आणि मिडल एफोबी कडे जाण्यासाठी वापर करता येईल. त्याशिवाय दक्षिण एफओबीला जोडणाऱ्या फलाट क्र. १ आणि २ च्या दक्षिण बाजूला नवीन जीना बांधण्यात आला आहे.** प्रवाश्यांना होणाऱ्या गैरसोयीसाठी अत्यंत दिलगीर आहोत.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
0264
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly


## उद्धव ठाकरे धृतराष्ट्र झालेत

संजय राऊतांच्या 'त्या' कृतीवर विजय शिवतारे यांची घणाघाती टीका

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

नुकतेच खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासंदर्भात प्रश्न विचारला असता खासदार संजय राऊत यांच्याकडून थुंकल्याची घटना घडली या संदर्भात शिंदे गटाचे शिवसेना नेते विजय शिवतारे यांनीही संजय राऊतांसह उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. शिवतारे म्हणाले की, ''संजय राऊतांनी केलेली कृती अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटण्याचे काम आहे. संजय राऊतांवर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहोत. तसेच, राऊतांची सुरक्षा व्यवस्था तातडीने कमी केली पाहिजे,'' असेही शिवतारे म्हणाले.



● ''विशेष म्हणजे अशा प्रकारची चुकीची कृती करूनही उद्धव ठाकरे गप्प आहेत. उद्धव ठाकरेंनी संजय राऊतांना फटकारले का नाही? ४० आमदार, खासदार, पक्ष आणि चिन्हही एका माणसामुळे गेलं. खालच्या पातळीला जाऊन निव्वळ प्रसिद्धी आणि सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरे करत आहे. यामुळे २०२४ च्या निवडणुकीत प्रचंड नुकसान होणार आहे.

● इतिहासात काळ्या अक्षराने उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांचं नाव लिहिलं जाणार आहे,'' असा घणाघात विजय शिवतारे यांनी केला आहे. तसेच हा माणूस माथेफिरू आहे. ४० वर्षांची संघटना संजय राऊतांमुळे संपलेली आहे. उद्धव ठाकरेंचं डोळे बंद असून, ते धृतराष्ट्र झाले आहेत. अजूनही त्यांना या माणसाला हाकलता येत नसेल, तर दुर्दैव असल्याचेही ते म्हणाले.

### शीतल म्हात्रे यांची संजय राऊत यांच्यावर कडाडून टीका

''सिल्व्हर ओकची चाकरी करणाऱ्या पायपुसण्याने खुर्चीकरिता सोनियांच्या दारी मुजरा करणाऱ्या पहिल्या ठाकरे पिता-पुत्रासंदर्भात आधी स्पष्टीकरण द्यावे आणि मग दुसऱ्यांवर टीका करावी. राजकारणासाठी बाळासाहेबांचं नाव घ्यायचं आणि 'सामना'तून त्यांचे फोटो वगळायचे हीच थुंकरट प्रवक्त्यांची नीती,'' असे म्हणत शीतल म्हात्रेंनी ट्वीट करत संजय राऊत यांच्यावर सडकून टीका केली आहे. संजय राऊत हे सातत्याने एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासह गेलेल्या ४० आमदारांवर टीका करताना दिसत आहेत. त्यावर आता शिंदे गटाच्या नेत्या शीतल म्हात्रेंनी राऊत यांचा खरपूस समाचार घेत, 'थुंकरट प्रवक्ते' असा संजय राऊत यांचा उल्लेख केला आहे.

## मुंबईकरांच्या पाणीपट्टीत वाढ!

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांमध्ये रविवार, दि. ४ जूनपर्यंत केवळ ११.७६ टक्के म्हणजे १ लाख, ७४ हजार ३ दशलक्ष लीटर जलसाठा शिल्लक असून याबाबत मुंबई महापालिकेकडून राज्य सरकारच्या अप्पर वैतरणा व भातसा धरणातून राखीव पाणीसाठा मिळावा, अशी मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली होती. दरम्यान, मुंबईला राज्य शासनाकडून शासनाच्या कोट्यातील अतिरिक्त पाणीसाठा मुंबईला देण्याचे मान्य करण्यात आले आहे. तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार व तुळशी या सात धरणांतून मुंबईला दररोज ३ हजार, ८५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा होतो. मुंबईकरांना वर्षभरात सातही धरणांत १४ लाख, ४७ हजार, ३६३ दशलक्ष लीटर पाण्याची गरज भासते. रविवार, दि. ४ जून रोजी सातही धरणांत १ लाख, ७४ हजार, ९३ दशलक्ष लीटर पाणीसाठा उपलब्ध असून राखीव साठ्यावर भातसा धरणातून ७५ हजार दशलक्ष पालिकेला मिळावी, अशी मागणी करण्यात आली होती.

### पाणीपट्टी वाढीला मुंबई भाजपचा विरोध

मुंबई महानगरपालिकेकडून शुक्रवार, दि. १६ जूनपासून मुंबईच्या पाणीपट्टी दरामध्ये वाढ करण्याची तयारी सुरू करण्यात आली असून लिटरमागे २५ पैसे ते चार रुपयांपर्यंत ही वाढ प्रस्तावित आहे. याबाबत या दरवाढीला आमचा तीव्र विरोध असल्याचे भाजप मुंबई अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी स्पष्ट केले आहे. ''एका बाजूला मुंबईकरांना मालमत्ता करात सूट देऊन, एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या बाजूला पाणीपट्टी वाढवून दुसऱ्या हाताने काढून घ्यायचे, हे चालणार नाही. मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना विनंती आहे की, त्यांनी ही पाणीपट्टी वाढ होण्यापासून रोखावी,'' असेही शेलार यांनी स्पष्ट केले आहे.


**विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड**

**सीआयएन:** एल२४१००एमएच१९८६पीएलसी०३९८३७
**नोंदणीकृत कार्यालय:** रिजन्ट चेंबर्स, ७ वा मजला, जमनालाल बजाज मार्ग, २०८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. **दूरध्वनी:** २२८२ २७०८/६९८२९०००
**वेबसाइट:** www.vinylchemicals.com

**नोटिस**

**कंपनीच्या समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन व प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ ॲथॉरिटी) मध्ये हस्तांतरण करणे**

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, इन्व्हेस्टर एज्युकेशन व प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ ॲथॉरिटी) (अकौन्टिंग, ऑडिट, ट्रान्सफर व रिफंड) नियम, २०१६ (नियम), सुधारित, सोबत वाचले असता कंपनी कायदा, २०१३ (कायदा) मधील कलम १२४ मधील तरतुदीं अंतर्गत कंपनीच्या ज्या (वित्तीय वर्ष २०१५-१६ दरम्यान घोषित इक्विटी समभागांच्या संदर्भात ओळीने सात वर्ष किंवा अधिक काळ लाभांशाचा दावा न केलेला) किंवा देण्यात आलेला नाही असे इक्विटी समभाग कंपनीला आयईपीएफ ॲथॉरिटीच्या डिमॅट खात्यात हस्तांतरित करावे लागतात.

ज्यांचे शेअर्स आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांना त्यांच्या दावा न केलेल्या लाभांशांवर दावा करण्याचा सल्ला देणाऱ्या स्वतंत्र नोटिसा कंपनीने संबंधित भागधारकांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठवलेल्या आहेत. कंपनीने अशा भागधारकांचा तपशील तिच्या www.vinylchemicals.com या वेबसाइटवर अपलोड केलेला आहे. आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी पात्र असणाऱ्या, अशा दावा न करण्यात आलेल्या लाभांशांच्या आणि शेअर्सच्या तपशीलाची पडताळणी करण्यासाठी संबंधित भागधारकांना सदर वेबसाइटचा संदर्भ घेण्याची विनंती करण्यात येत आहे.

वित्तीय वर्ष २०१५-१६ आयईपीएफ मध्ये हस्तांतरीत करण्यात येण्यापूर्वी ज्यांच्यावर दावा करण्यात आला नव्हता किंवा ते प्रदान करण्यात आले नव्हते, दावा करण्याची भागधारकांना विनंती करण्यात येते.

वास्तविक स्वरूपात भागधारणा करणारे आणि ज्यांचे शेअर्स हे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी पात्र आहेत अशा संबंधित भागधारकाने (भागधारकांनी) नोंद घ्यावी की त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ शेअर सर्टिफिकेट (सर्टिफिकेट्स) हे स्वयचंलितपणे रद्द होईल आणि वाटाघाटीयोग्य नसल्याचे (नॉन-नेगोशिएबल) मानण्यात येईल. शेअर्स डिमॅट स्वरूपात धारण करण्यात येण्याच्या बाबतीत, शेअर्स हस्तांतरीत करण्यासाठी पात्र असण्याच्या मर्यादेपर्यंत, ते भागधारकांच्या खात्यातून डेबिट करण्यात येतील आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात येतील.

**संबंधित भागधारकांनी ४ सप्टेंबर, २०२३ पुर्वी त्यांच्या लाभांशाचा दावा न केल्यास, नियमांचे पालन करण्याच्या दृष्टीकोनातून कंपनी, भागधारकांना कोणतीही पुढील सूचना न देता सदर समभागांचे आयईपीएफ ॲथॉरिटी यांचेकडे हस्तांतरण करेल आणि सदर हस्तांतरित केलेल्या समभागांच्या बाबतीत कंपनीपाशी कोणतीही दायित्व नसेल.**

भागधारकांनी याची नोंद घ्यावी की आयईपीएफ प्राधिकरणाकडे शेअर्स हस्तांतरीत करण्यात आल्यावर, यामध्ये अशा शेअर्सवर उपार्जित होणारे सर्व लाभ समाविष्ट, जर असल्यास, नियमांतर्गत विहित करण्यात आल्याप्रमाणे फॉर्म आयईपीएफ-५ मध्ये आयईपीएफ प्राधिकरणाकडे स्वतंत्र अर्ज करून केवळ आयईपीएफ प्राधिकरणाकडे सदरकरिता दावा करण्यात येऊ शकतो आणि आयईपीएफ वेबसाइटवर म्हणजेच www.iepf.gov.in वर सदर उपलब्ध करून देण्यात येईल.

वरील संदर्भात काही चौकशी करायची असल्यास, भागधारकांनी कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजन्ट, मेसर्स टीएसआर कन्सल्टन्संट प्रा. लि. यांच्याशी सी-१०१, १ला मजला, २४७ पार्क, लाल बहादुर शास्त्री मार्ग, विक्रोली (प.) , मुंबई-४०००८३, ईमेल: csg-unit@tcplindia.co.in वेबसाईट: www.tcplindia.co.in किंवा कंपनीचा ईमेल cs.vinylchemicals@pidilite.com येथे संपर्क साधावा.

**विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड करिता**
ठिकाण : मुंबई **पी.सी. पटेल**
दिनांक : ०६/०६/२०२३ सेक्रेटरी


# शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त विशेष टपाल तिकीट

■ सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा पुढाकार ■ मान्यवरांच्या उपस्थितीत आज राजभवनात अनावरण

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून राज्यात वर्षभर विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कर्तृत्वाला मानवंदना देण्यासाठी सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाने भारतीय टपाल विभागाच्या सहकार्याने एक टपाल तिकीट काढण्याचा निर्णय घेतला असून मंगळवार, दि. ६ जून रोजी राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते राजभवन येथील दरबार हॉलमध्ये या तिकिटाचे अनावरण होणार आहे.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा, शिक्षण व मराठी भाषामंत्री दीपक केसरकर, पोस्ट मास्टर जनरल स्वाती पांडे, प्रधान सचिव विकास खारगे, राज्यपालांचे सचिव संतोषकुमार प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

“ 'छत्रपती शिवाजी महाराज' हा आमच्यासाठी चेतनेचा संचार करणारा प्रेरणामंत्र आहे. कित्येक राष्ट्रनायकांना लढण्याची आणि विजयाची गाढ प्रेरणा देणारे अद्वितीय व्यक्तिमत्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज असून त्यांचा विचार जनभारत जना जनानांत आणि मनामनांत पोहोचविण्याचा दृढ निश्चय महाराष्ट्र सरकारने घेतला असून याचाच एक भाग म्हणून महाराजांवरील पोस्ट तिकीट प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला आहे.



**– सुधीर मुनगंटीवार,** सांस्कृतिक कार्यमंत्री, महाराष्ट्र

● शिवराज्याभिषेकाचे महत्व अधिक ठळकपणे अधोरेखित करण्याचा महाराष्ट्र शासनाचा विचार असून, माँ जिजाबाई यांची यामागील भावना, संकल्पना लोकांपर्यंत पोहोचण्याचा यामागील उद्देश आहे.

महाराजांच्या काळातील नाणी, गडकिल्ले, अष्टप्रधान मंडळ आदी प्रत्येक गोष्ट ही प्रेरणादायी आहे.

● या प्रेरक गोष्टी सर्वांपर्यंत सहजपणे पोहोचविण्यासाठी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनातून राज्याचा सांस्कृतिक विभाग पुढे सरसावला असून, ''अस्मानी पातशाह्यांना टक्कर देणारा आणि स्वतःच्या जोरावर स्वराज्य स्थापन करणारा छत्रपती शिवाजी हे महान राजे खरे नायक आहेत; हे भावी पिढीलासुद्धा कळावे, हीच आमची भावना असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.



### 'शिवंवदना' कार्यक्रमाचे आयोजन

टपाल तिकीट अनावरणानंतर सांस्कृतिक कार्य संचलनालयाच्यावतीने 'शिवंवदना' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.


**GOVERNMENT OF INDIA**
**MINISTRY OF SKILL DEVELOPMENT & ENTREPRENEURSHIP**
**REGIONAL DIRECTORATE OF SKILL DEVELOPMENT & ENTREPRENEURSHIP**
SION, MUMBAI - 400 022

**Email: nsti-mumbai@dgt.gov.in | Website: nstimumbai.dgt.gov.in, nstiwmumbai.dgt.gov.in | Tel / Fax: 022 - 2405 3560**

The Regional Directorate of Skill Development & Entrepreneurship (RDSDE) , Government of India, Ministry of Skill Development & Entrepreneurship at Chunabhatti, Sion(E), Mumbai, is conducting Craftsmen Training Scheme (CTS/ITI) under NCVET at NSTI, Sion(E) & NSTI(Women),Dadar(E), Mumbai under this directorate. In this regards applications are invited for the Session 2023-24 under following trades:-

**CTS/ITI ADMISSION NOTICE-2023-24**

1. Courses offered at NSTI, Sion, Chunabhatti, Mumbai- 400022

| Sl. | Particulars of Trades | Duration |
| --- | --- | --- |
| 1. | Internet of Things (Smart Health Care) (NSQF Level - 4) | 1 Yrs |
| 2. | Solar Technician(Electrical)(NSQF Level- 4) | 1 Yrs |

1.Courses offered at NSTI(Woman), Dadar (W), Mumbai- 400028

| Sl. | Particulars of Trades | Duration |
| --- | --- | --- |
| 1. | Architecture Draughtsman (NSQF Level - 5) | 2 Yrs |
| 2. | Computer Operator & Programming Assistant (COPA)(NSQF Level- 4) | 1 Yrs |
| 3. | Cosmetology (NSQF Level - 4) | 1 Yrs |
| 4. | Dress Making (NSQF Level - 4) | 1 Yrs |

Application form started from : 01.06.2023
Last date of submission Application form: 30.06.2023
Issue of Merit list : 10.07.2023
Date of CTS Admission : 12.07.2023

Eligibility Qualification i. Passed 8th Class examination or equivalent for Dress Making
ii. Passed 10th Class examination with Science & Mathematics or its equivalent.

How to Apply: Candidates desiring admission may apply by visiting our Website: www.nstimumbai.dgt.gov.in & www.nstiwmumbai.dgt.gov.in
Admission Link : https://forms.gle/fy7B2YwzVVVZNWuK8
Offline :- Walk in to respective NSTI.

SCAN QR CODE
Apply here

REGIONAL DIRECTOR, RDSDE, MUMBAI